**मंजूर विकास योजना- अमरावती (सुधारित)**
मौजे बडनेरा ता. व जि. अमरावती येथील सर्व्हे क्र. २४७/३ या जमिनीवरील आरक्षण क्र. -३३२ (हायस्कूल), आरक्षण क्र.-३३३ (खेळाचे मैदान), आरक्षण क्र. ३३४ (प्राथमिक शाळा), आरक्षण क्र. ३३५ (प्रसुतिगृह व दवाखाना) या आरक्षणाखालील क्षेत्राबाबत, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७(२) अन्वये आदेश...

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२,**
**दिनांक : १८.०६.२०२५**

**शासन निर्णय क्र. टिपीएस-२८२५/प्र.क्र.६४/२०२५/नवि-३०**

**शासन निर्णय** :- सोबतचे आदेश (मराठी व इंग्रजी) महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करावेत.

***महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,***

(प्रसाद रा. शिंदे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०० ०३२.
४) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०० ०३२.
५) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई- ०३२.
६) मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०० ०३२.
७) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०० ०३२.
८) अपर मुख्य सचिव (नवि-१) नगर विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९) संचालक (नगर रचना) तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**प्रत,**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे.
२) विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती .

३) सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती.

४) जिल्हाधिकारी, अमरावती.

५) आयुक्त, अमरावती महानगरपालिका, अमरावती.

६) सहायक संचालक, नगर रचना, अमरावती शाखा, अमरावती.

(त्यांना कळविण्यात येते की, सोबतच्या आदेशाच्या अनुषंगाने अधिप्रमाणित करण्यात यावयाच्या भाग नकाशाच्या पाच प्रती शासनास विहीत मार्गाने सादर करण्यात याव्यात.)

७) व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय, नागपूर.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतचे शासकीय आदेश महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्राच्या भाग-१ अमरावती विभाग, अमरावती पुरवणी भाग १ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी ५ प्रती या विभागास, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती, सहायक संचालक, नगर रचना, अमरावती शाखा, अमरावती, आयुक्त, अमरावती महानगरपालिका अमरावती यांना पाठवाव्यात.

८) निवडनस्ती (नवि-३०).

*************

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**दिनांक : १८.०६.२०२५**

## आदेश

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६*

**क्र.टिपीएस-२८२५/प्र.क्र.६४/२०२५/नवि-३०**:- ज्याअर्थी, अमरावती शहराची सुधारित विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम ३१ अन्वये, नगर विकास विभागाची अधिसूचना क्र.टिपीएस-२८९२/११८०/प्र.क्र.९०-९२(बी)/नवि-१३, दि.०४.१२.१९९२ अन्वये मंजूर केली असून ती दि.२५.०२.१९९३ पासून अंमलात आली आहे. (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौजे बडनेरा, ता. व जि. अमरावती येथील सर्व्हे क्र.२४७/३ या जमिनीवरील क्षेत्र (यापुढे "उक्त आरक्षित जमीन" असे संबोधिले आहे) आरक्षण क्र. -३३२ (हायस्कूल), आरक्षण क्र.-३३३ (खेळाचे मैदान), आरक्षण क्र. ३३४ (प्राथमिक शाळा), आरक्षण क्र. ३३५ (प्रर्सुतिगृह व दवाखाना) (यापुढे "उक्त आरक्षणे" असा उल्लेख केला आहे.) या प्रयोजनासाठी आरक्षित आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाचे समुचित प्राधिकरण अमरावती महानगरपालिका, अमरावती आहे. (यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असा उल्लेख केला आहे.)

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त आरक्षित जमीन, उक्त विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून दहा वर्षाच्या कालावधीत संपादन केली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील उक्त आरक्षित जमीनीपैकी मौजे बडनेरा, ता. व जि. अमरावती येथील सर्व्हे क्र. २४७/३ मधील २.७७ हे. आर. (यापुढे "उक्त जमीन" असे संबोधिले आहे) क्षेत्राच्या मालकांनी, उक्त अधिनियमाचे कलम १२७*(१)* नुसार नियोजन प्राधिकरण असलेल्या उक्त समुचित प्राधिकरणावर उक्त आरक्षणांसंदर्भात उक्त अधिनियमाचे कलम १२७*(१)* अन्वये दि.२९.०३.२०१४ रोजी सूचना बजावली आहे. (यापुढे "उक्त सूचना" असा उल्लेख केलेला आहे.)

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यानंतरही उक्त समुचित प्राधिकरणाने, विहित कालावधीत उक्त जमीन संपादन केली नाही अथवा त्या संपादन करण्यासंबंधीची उक्त अधिनियमाचे कलम १२६(४) सह, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिध्द केली नाही;

नगर विकास विभाग, सत्यमेव जयते, मंत्रालय, मुंबई-32.

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या मालकांनी मा. मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे रिट याचिका क्र. १०५९/२०१६ दाखल केली असून सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि.१३.०६.२०१६ रोजी आदेश पारित केले आहेत.

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यापासून, उक्त समुचित प्राधिकरणाने विहित कालावधीत उक्त जमीन संपादन केली नाही अथवा उक्त जमीन संपादन करण्यासंबधीची उक्त अधिनियमाचे कलम १२६(४) सह भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिध्द केलेली नाही. त्यामुळे या परिस्थितीत उक्त अधिनियाचे कलम १२७(१) मधील तरतूदीनुसार उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणे व्यपगत झाले असल्याचे शासनाचे मत झाले आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) नुसार प्राप्त अधिकारात राज्य शासन अमरावती शहराच्या सुधारित विकास योजनेतील, मौजे बडनेरा, ता. व जि. अमरावती येथील सर्व्हे क्र. २४७/३ या मधील, खालील सारणीमध्ये नमूद केल्यानुसार २.७७ हे. आर. क्षेत्रावरील आरक्षण क्र. -३३२ (हायस्कूल), आरक्षण क्र.-३३३ (खेळाचे मैदान), आरक्षण क्र. ३३४ (प्राथमिक शाळा), आरक्षण क्र. ३३५ (प्रसुतिगृह व दवाखाना) ही आरक्षणे व्यपगत झाल्याचे अधिसूचित करीत आहे व अशाप्रकारे आरक्षणांतून मुक्त झालेली जमीन या संबंधित जमीनमालकास उक्त विकास योजनेतील लगतच्या अनुज्ञेय भूवापराप्रमाणे अन्यथा अनुज्ञेय असलेल्या विकासाकरीता उपलब्ध होईल;

**सारणी**

| अ. क्र. | गावाचे नांव तालुका व जिल्हा | जमिनीचा सर्व्हे क्र. / हिस्सा क्र. | उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) अन्वये व्यपगत होणारे क्षेत्र | मंजूर विकास योजनेमधील प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १ | मौ. बडनेरा, ता. जी. अमरावती | सर्व्हे क्र. २४७/३ | २.७७ हे. आर. | आरक्षण क्र. ३३२ (हायस्कूल), आरक्षण क्र. ३३३ (खेळाचे मैदान), आरक्षण क्र. ३३४ (प्राथमिक शाळा), आरक्षण क्र. ३३५ (प्रसुतिगृह व दवाखाना) |

प्रस्तुत आदेशान्वये उक्त आरक्षणामधून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणाऱ्या भाग नकाशाची प्रत आयुक्त, अमरावती महानगरपालिका, अमरावती यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात आली आहे.

सदरचे आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे / नियम) या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,*

(प्रसाद रा. शिंदे)

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**Government of Maharashtra**
Urban Development Department
Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032.
**Dated : 18.06.2025**

# ORDER

*The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966:*

**No.TPS-2825/C.R.64/2025/UD-30**:- Whereas, the Revised Development Plan of Amravati, has been sanctioned by the Government under section 31 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") vide Notification No. TPS-2892/1180/CR-90-92(B)/UD-13, dt.04.12.1992 and has come into force with effect from dt.25.02.1993 (hereinafter referred to as "the said Development plan"):

And whereas, in the said Development Plan, the land bearing Survey No.247/3 of Mauje Badnera, Tal. and Dist. Amravati, (hereinafter referred to as "the said Reserved Land") is reserved for Site No. 332-'High School', Site No.333-'Play Ground', Site No.334-'Primary School', Site No.335-'Dispensary and Maternity Home' (hereinafter referred to as "the said Reservations"):

And whereas, the Amravati Municipal Corporation, Amravati is "Appropriate Authority" for the said Reservations. (hereinafter referred to as "the said Appropriate Authority")

And whereas, the said Reserved Land has not been acquired by the said Appropriate Authority within ten years from the date on which the said Development Plan came into force:

And whereas, the Owners of the land bearing Survey No.247/3 of Mauje Badnera, Tal. and Dist. Amravati, area admeasuring 2.77 Hect. Are. (hereinafter referred to as "the said Land") of the said Reserved Land, in reference to the Said Reservations, had served a notice dated 29.03.2014 under section 127(1) of the said Act to the said Appropriate Authority, being the Planning Authority (hereinafter referred to as "the said Notice");

And whereas, even after service of the said Notice as aforesaid, the said Land had neither been acquired, within prescribed time period nor the Notification of land acquisition required under section 126 (4) of the said Act, read with Section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, has been published by the said Appropriate Authority within prescribed time period from the date of the service of said Notice under sub-section (1) of section 127 of the said Act:

And whereas, the owners of the said Land have filed Writ Petition No.1059/2016 before the Hon'ble Bombay High Court, Nagpur Bench, and the final order is passed dated 13.06.2016 by the Hon'ble High Court;

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई 32. सत्यमेव जयते

And whereas, it is observed that, the said Land had neither been acquired, within prescribed time period from the date of service of Notices, nor Notification of land acquisition required under section 126*(4)* of the said Act, read with section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, been published within prescribed time period by the said Appropriate Authority. And, in consequence thereof, the Government of Maharashtra is of opinion that, the said Reservations on the said Land stands lapsed as per the provisions of section 127*(1)* of the said Act;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(2)* of section 127 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, as mentioned in the table below, hereby notifies that, the said Reservations i.e Site No. 332-'High School', Site No.333-'Play Ground', Site No.334-'Primary School', Site No.335-'Dispensary and Maternity Home', as specified in the Revised Development Plan of Amravati, stands lapsed to the extent of area admeasuring 2.77 Hect. Are. bearing Survey No.247/3 of Mauje Badnera, Tal. and Dist. Amravati and the area so released will be available to the owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Development Plan.

**TABLE**

| **Sr. No.** | **Name of the Village, Taluka and Dist.** | **Survey No. / Hissa No.** | **Area lapsed under section 127*(2)* of the said Act** | **Reservations of sanctioned Revised Development Plan** |
|---|---|---|---|---|
| 1 | Mauje Badnera, Tal. and Dist. Amravati | Survey No.247/3 | 2.77 Hect. Are. | Site No. 332-'High School', Site No.333-'Play Ground', Site No.334-'Primary School', Site No.335-'Dispensary and Maternity Home' |

A copy of the Part Plan, showing the area of the said Reservations which have been lapsed vide this Order, is available in the office of the Commissioner, Amravati Municipal Corporation Amravati during office hours on all working days for inspection of public for the period of One month.

This Order shall also be published on the Govt. website www.maharashtra.gov.in (Acts/ Rules).

***By order and in the name of the Governor of Maharashtra,***

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-32. सत्यमेव जयते

(Prasad R. Shinde)
**Under Secretary to Government**